कार्यालयनागपूरमहानगरपालिका,नागपूर
(उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)
छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, 6 वा माळा,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-400001
Email gardendept.nmc@gmail.com


क्रमांक:-NMC/OWL/GRDN/2026-27/1245 दिनांक : 16/07/2026

प्रति,

श्रीमती मंजुषा हर्षवर्धन माडीकर,
स्पंदन हार्ट इंस्टीटयुट, रामदासपेठ,
नागपूर.

विषय :- प्लॉट नं. 4 व 10, ख.क्र. 3/2,4/2,5/2, मौजा परसोडी, मुळीक लेआउट, नागपूर येथील जागेवर प्रस्तावित नविन हॉस्पीटल इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या झाडांबाबत.

संदर्भ :- कार्यालयास प्राप्त आपले दिनांक 17.03.2026 चे पत्र अन्वये.

वरील अर्जान्वये मोक्यावर जाऊन झाडाची/ झाडांची पाहणी करून झाडाच्या/झाडांच्या स्थितीचे निरीक्षण केले असता –

1. मा. प्रशासक तथा अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण समिती, म.न.पा. नागपूर यांच्या दिनांक 04.06.2026 च्या मंजुरी अन्वये आपणास खालील झाडे कापणी / छाटणी करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

**प्लॉट नं. 4 व 10, ख.क्र. 3/2,4/2,5/2, मौजा परसोडी, मुळीक लेआउट, नागपूर येथील जागेवर प्रस्तावित नविन हॉस्पीटल इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पिंपळ 1, कडूनींब 1, दोन नग हेरीटेज व अशोका 1, नॉन हेरीटेज एक नग अशी एकूण 03 नग झाडांपैकी कडुनींब व अशोका प्रजातीच्या झाडास जमिनीपासून कापणी करणे व पिंपळ प्रजातीच्या झाडास प्रत्यारोपण करण्याची आपणास परवानगी देण्यात येते.**

2. आपणास परवानगी पत्रात उल्लेखलेल्या झाडाव्यतिरिक्त इतर प्रजातीची झाडे/झाडांच्या फांद्या छाटणी / कापणी करण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.

3. आपणास झाड/झाडे/झाडांच्या फांद्या स्वखर्चाने व स्वतःच्या जबाबदारीवर छाटणी / कापणी कराव्या लागतील. झाड / झाडे / झाडांच्या फांद्या छाटणी / कापणी करतांना रहदारीला अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

4. **तोडण्यात/ प्रत्यारोपण करण्यात येणाऱ्या 03 झाडाऐवजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021 / आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट–कलम (4) (ब) अन्वये तोडण्यात येणाऱ्या त्याचजातीची किंवा इतर कोणत्याही मूळ जातीची तोडण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजित केलेल्या वयाइतक्या झाडाच्यासंख्येइतकी किमान सहा फुट इतक्या उंचीची 176 नग नविन झाडांची लागवड करावी. पोट-कलम (5 अ) अन्वये लागवड करण्यात येणारी झाडे आपणास कमीत कमी सात वर्षाच्या कालावधी करिता जगवावी लागेल. या कालावधीत झाडे न जगल्यास तितक्याच संख्येतील झाडांची लागवड करून त्याची हनीपुर्ती (भरपाई) करण्यात यावी. तसेच लागवड करण्यात आलेल्या झाडाचा फोटोसह अहवाल दर सहा महिन्यात कार्यालयास सादर करावा.**

5. सदर परवानगी पत्रानुसार व नमूद केलेल्या अटीनुसार झाड/झाडे/झाडांच्या फांद्या छाटणी/कापणी कराव्या लागतील अन्यथा महाराष्ट्र(शहरी क्षेत्र)वृक्षजतन (सुधारित) अधिनियम 1975 अन्वये आपल्यावर कार्यवाही करण्यात येईल.

6. **वृक्ष तोडण्याची परवानगी दिल्यापासून 15 दिवसानंतरच वृक्ष तोडण्यात यावे.**

7. वृक्ष प्रत्यारोपण (Transplant) करण्याकरिता तांत्रिक सल्ला आवश्यक असल्यास उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, म.न.पा. नागपूर ला संपर्क साधावा.

8. परवानगी देऊनही झाड किंवा झाडाच्या फांद्या न कापणी केल्यास झाड किंवा झाडाची फांदी पडून जीव व वित्तहानी झाल्यास सर्वस्वी जवाबदारी आपली राहील. कृपया याची नोंद घ्यावी.

9. **परवानगी व्यतीरीक्त इतर हेरीटेज व नॉन हेरीटेज वृक्ष असल्यास आपण हेरीटेज व नॉन हेरीटेज वृक्षाची कापणी करू नये. हेरीटेज व नॉन हेरीटेज वृक्षाची कापणी केल्यास महाराष्ट्र शासनराजपत्र असाधारण भाग आठ, जुलै 16, 2021 / आषाढ 25 शके 1943 अन्वये प्रकरण 8 मुख्य अधिनियमाच्या कलम 21 मधील पोट–कलम (1) मध्ये एक हजार रुपयापेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या या मजकुराऐवजी शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल, अश्या पद्धतीचा वापर करून काढलेल्या झाडाच्या मुल्याइतके परंतु 1,00,000/- रुपयापेक्षा कमी नसेल इतक्या रकमेचा मजकूर दाखल करण्यात येईल. कृपया याची नोंद घ्यावी.**

9. **कापणी करण्यात येणाऱ्या 03 नग (02 हेरीटेज व 01 नॉन हेरीटेज) झाडाच्या मोबदल्यात पर्यायी नविन सावलीची 176 नग वृक्ष लागवड करून छायाचित्रासह नियोजन आराखडा 30 दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करावे. अन्यथा डिपॉझीट रक्कम परत केल्या जाणार नाही.**

वृक्ष संवर्धक
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :- वनपरिक्षेत्र सेमिनरी हिल्स, नागपूर यांना माहितीकरिता सादर.

Recd 16/07/2026

Scanned with OKEN Scanner